जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद कोल्हापूर
पत्ता - जुनी प्रशासकिय इमारत नागाळा पार्क कोल्हापूर
फोन नंबर - (०२३१) २६५१०४४,
ई मेल आयडी - nbakolhapur@gmail.com

जा.क्र.जिपको/DWSM/कावि- ०५ /३६४/३७६ /२०१६ दिनांक: ७ /१२/२०१६

***अत्यंत महत्वाचे***

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ,---------सर्व

**विषय- पाणी व स्वच्छता विषयक उपाययोजनांची अंमलबजावणी आपल्या गटाकडील सर्व ग्रामपंचायतींमध्ये तात्काळ करणे बाबत------------**

**संदर्भ- १) जा.क्र.जिपको/DWSM/HRD/१५२/२०१६ ,दिनांक:३१/०८/२०१६ चे पत्र**
**२)रिध्दी फौडेशन.कोलकत्ता यांचा माहे आक्टोबर १६ मधील दोन ग्रा.प.क्षेत्रभेट पडताळणी अहवाल**

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)कार्यक्रमातंर्गत अपराकाम्य(Non-negotible) मुद्याबाबत कार्यवाही करणेबाबत सुचित केले होते.तथापि याप्रमाणे कार्यवाही नझालेने संदर्भ क्र.२ नुसार अर्जुनी,ता.कागल व ठिकपुर्ली,ता.राधानगरी या दोन हागणदारीमुक्त झालेल्या ग्रा.प.मध्ये रिध्दी फौडेशन.कोलकत्ता यांचे प्रतिनिधींनी माहे आक्टोबर १६ मध्ये क्षेत्रभेट देवनु पडताळणी करुन पाहणी करुन अहवाल सादर केला आहे.सदरचा अहवाल राज्य शासनाकडे सादर केला असुन राज्य शासनानेही नाराजी व्यक्त केली आहे.सदरची बाब अतिशय गंभीर असुन केंद्र शासनामार्फत जिल्हयातील सर्व ग्रा.प.ची पडताळणी जानेवारी २०१६ मध्ये होणार आहे.तरी यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहु नये यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही आपल्या गटाकडील सर्व ग्रा.प.मध्ये करावी.

| अ.क्र | कार्यवाहीचे मुद्ये | तपशिल |
|---|---|---|
| १ | पायाभुत सर्व्हे नुसार शौचालय बांधकाम व्याप्ती | पायाभुत सर्व्हे नुसार वैयक्तीक शौचालय बांधकाम १०० % पुर्ण करुन घेणे |
| २ | ODEP आराखडा करणे, देखरेख व पाठपुरावा समिती स्थापन करणे | १)विहित नमुण्यातील ODEP आराखडा तयार करुन आराखडयास ग्रामसभेची मंजुरी घेणे<br>२)देखरेख व पाठपुरावा समिती स्थापन करुन समितीमार्फत सभा आयोजित करणे त्याचे इतिवृत्त ठेवणे |
| ३ | माहिती प्रचार प्रसिध्दी (IEC) | १)स्वच्छतेचे विषयी पाच संदेश सार्वजनिक ठिकाणी लिहणे,<br>२)शौचालय बांधकाम तांत्रिक मार्गदर्शन यासाठी हस्तपत्रिका वाटप करणे,<br>३)गवंडी बैठका घेवुन तांत्रिक मार्गदर्शन करणे<br>४)ग्रामस्थांना पाणी व स्वच्छता विषयक फिल्म दाखविणे |
| ४ | शौचालय बांधकाम तांत्रिक व दर्जात्मक करणे | १)नवीन शौचालय बांधकाम दोन शौषखडयाचे बांधणे,<br>२)शौचालयाकरिता तीर्व उताराची भांडी वापरणे<br>३)शौचालयांचे पक्के बांधकाम करणे,<br>४)शौचालयाजवळ हात धुण्याचे व्यवस्था करणे,<br>५)शौचालयाजवळ पाण्या उपलब्धता व्यवस्था करणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | स्वच्छता उपक्रमाचा आढावा | १)प्रत्येक ग्रामसभा व मासिक सभेमध्ये स्वच्छता उपक्रमाचा आढावा घेणे,<br>२)ग्रामसेवकांच्या सहीने गट विकास अधिकारी यांनी मासिक प्रगती अहवाल घेणे<br>३)शौचालय नसलेली शिल्लक उदिदष्ट यादी ग्रा.प.इमारतीवरती दर्शणी जागेवरती रंगवुन घ्यावी. |
| ६ | १)अंगणवाडी/शाळा/महाविद्यालय पाणी व स्वच्छता सुविधा गावातील<br>२)शासकीय,निमशासकीय कार्यालयात स्वच्छता गृहाची उपलब्धता | १) मुला-मुलीसाठी स्वतंत्र शौचालये ,मुतारी बांधकाम करुन घेणे यासाठी शिक्षकाचा सहभाग घेणे. स्वच्छतेसाठी कायमस्वरुपी स्वच्छता कर्मचारी नेमणे. पिण्याचे पाण्या व हातधुणेसाठी हॅण्डवॉश ची सुविधा उपलब्ध करणे<br>२) ग्रामपंचायतस्तरावरील सर्व शासकिय व निमशासकीय कार्यालयमध्ये स्वतंत्र शौचालय व मुतारींची व्यवस्था करणे |
| ७ | आर्थिक व्यवस्थापन | यापुर्वी देणेत आलेल्या पत्रानुसार ७ दिवसाच्या आत लाभार्थ्यांना अनुदान RTGS ने प्राप्त होईल याप्रमाणे कार्यवाही करणे |
| ८ | SC/ST/BPL लाभार्थ्यांबाबत | दुर्बल घटकातील पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरित होईल याची दक्षता घेणे |
| ९ | मनरेगा अभिसरण | वाढीव यादीमधील कुटुंबांना मनेरगामधुन रु.१२०००/-प्रमाणे अनुदान देणेसाठी आवश्यक कार्यवाही करावी. |
| १० | स्वच्छ भारत मिशन सनियंत्रण प्रणाली | गाव स्तरीय MIS रजिस्टर मध्ये शौचालय असलेली ,नसलेली कुटुंब संख्या व प्रगती, वर्ष ,माहे निहाय शौचालय बांधकाम प्रगती माहिती अद्ययावत करणे |
| ११ | तालुका व ग्रा.प.समन्वय | तालुकास्तरावरुन प्रत्येक ग्रा.प.साठी पालक अधिका-याची नेमणुक करुन गविअ यांनी साप्ताहिक आढावा घ्यावा |
| १२ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन | घनकचरा सांडपाण्यासाठी व्यवस्थापन बाबत बृहत आराखडा तयार करुन त्या प्रमाणे कार्यवाही करावी. |

उपरोक्त घटक निहाय बाबींची आपल्या गटाकडील सर्व ग्रामपंचायतीमध्ये पुर्तता दि.३१.१२.२०१६ पर्यंत विनाविलंब करुन घेणे आवश्यक आहे. सदर विषयाचे महत्व लक्षात घेता हागणदारी मुक्त गावाचा दर्जा सुधारण्यासाठी व स्वच्छतेत सातत्य टिकण्यासाठी तालुका स्तरावरील जबाबदार अधिकार-यांना ग्रा.प.ची जबाबदारी देवुन वरीलप्रमाणे कार्यवाही वेळेत होईल याची दक्षता घ्यावी.तसेच तालुकास्तरावरुन पथक स्थापन करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची पडताळणी करावी व याबाबतचा सचित्र अहवाल मला व्यक्तिश: सादर करावा.***दि.३१ डिसेंबर २०१६ नंतर मी आपल्या गटाकडील कोणत्याही ग्रा.प.ला भेट देवुन वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची पाहणी करणार आहे.यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी निदर्शनास आल्यास संबधीत ग्रा.प.चे ग्रामसेवक,विस्तार अधिकारी (पंचा.) व याकरिता जबाबदारी दिलेल्या तालुका अधिका-यावरती प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची जाणीव संबधीतांना आपल्या स्तरावरुन द्यावी.***

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता)
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि. प. कोल्हापूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,कोल्हापूर.